राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID. ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.**

---

<u>कालमर्यादा – ०४/०२/२०२१</u>

जा.क्र.तंशि/विकापु/आस्था-१/२०२१/५७५ दि. 03 FEB 2021

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय व अनुदानित पदवी संस्था

**विषय- स्वायत्तता देण्याकरिता गठीत करण्यात येणा-या तज्ञ समिती तसेच स्वायत्तता दिलेल्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळावर राज्य शासनाचा प्रतिनिधी देण्याबाबत....**

संदर्भ- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.गुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी /मान्यता/ २०२०/१४१ दिनांक ०३/०२/२०२१

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन आपल्या संस्थेचे प्राचार्य व प्राध्यापक यांची माहिती विहीत प्रपत्रात भरुन या कार्यालयांस दिनांक ०४/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत पाठवावी.

सदर माहिती Sakal Marathi font – New Microsoft Excel Worksheet मधे तयार करावी. माहितीची Softcopy <u>est.ropune@gmail.com</u> व desk2@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०२०/ १४१      दिनांक : 03 FEB 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
03 FEB 2021
आवक क्र. 9064

विषय : स्वायत्तता देण्याकरीता गठीत करण्यात येणा-या तज्ञ समिती तसेच स्वायत्तता दिलेल्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळावर राज्य शासनाचा प्रतिनिधी देण्याबाबत....

संदर्भ : शासन पत्र क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१२/तांशि-३, दि. १४ जानेवारी, २०२१

विषयांकीत शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन पत्रान्वये राज्यातील विविध महाविद्यालयांना स्वायत्तता देताना गठीत करावयाच्या तज्ञ समितीवर तसेच स्वायत्तता दिलेल्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळावर नियुक्ती करण्यासाठी पात्र असलेल्या अधिका-यांची माहिती सादर करण्यास सुचित केले आहे. सबब शासनाने सुचित केल्यानुसार आपल्या स्वतःच्या माहितीसह, आपल्या विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय व शासन अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकाची माहिती खालील प्रपत्रात आजच desk2@dtemaharashtra.gov.in या ईमेल वर उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर माहितीची Soft copy सुध्दा ई-मेल वर पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | कार्यालयाचे नांव | पत्ता | दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

आपला

(श्री. संदिप तडस)
प्र. उपसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आर२४११-१
3/2/21

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID - hted.vishi3-mh@gov.in

---

क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र. १२/विशि-३ दिनांक :- १४ जानेवारी, २०२१.

प्रति,

१. संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

२. संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
मुंबई.

विषय:-स्वायत्तता देण्याकरिता गठीत करण्यात येणाऱ्या तज्ञ समिती तसेच स्वायत्तता दिलेल्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळावर राज्य शासनाचा प्रतिनिधी देण्याबाबत.

महोदय,

मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. १२ फेब्रुवारी, २०१८ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार महाविद्यालयास स्वायत्तता देण्याकरिता गठीत करण्यात येणाऱ्या तज्ञ समिती तसेच कलम १३ मधील तरतुदीनुसार स्वायत्त महाविद्यालयाच्या "Governing Body" वर शासनाचा प्रतिनिधीची सदस्य म्हणून नेमणूक करण्याची तरतूद आहे.(Academician not below the rank of Professor or State Government Official of Directorate Higher Education / State Council of Higher Education).

त्या अनुषंगाने राज्यातील विविध महाविद्यालयांना स्वायत्ता देताना गठीत करावयाच्या तज्ञ समितीवर तसेच स्वायत्ता दिलेल्या महाविद्यालयाच्या नियांमक मंडळावर नियुक्ती करण्यासाठी पात्र असलेल्या प्राचार्य, प्राध्यापक तसेच विभागीय सहसंचालक यांची नावे, पत्ता, दूरध्वनी क्रमांक तसेच भ्रमणध्वनी क्रमांक याबाबत अद्ययावत माहितीची यादी तात्काळ शासनास सादर करावी, ही विनंती.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

Sh. Tadas

Urgent

17.02.2021